# शिक्षक संघ बैठक दि.२३/११/२०१६ इतिवृत्त

| अ.क्र. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | कोल्हापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाने दि.१२/१०/१२, २९/१२/१२, १९/११/१४ व १५/५/१५ च्या बैठकीत उपस्थित केलेल्या प्रकरणी तात्काळ कार्यवाही करणेबाबत आपण आदेश दिले होते. त्या प्रकरणी कार्यवाहीचे प्रकरणनिहाय स्वरूप समजावे. (सर्वश्री. केंगार,न्यू इंग्लिश स्कूल, मिरज, श्री.म्हेत्रे, भारत शिक्षण संस्था, उटगी, श्री.ए.पी.गायकवाड, मॉडर्न इंग्लिश स्कूल व ज्यु. कॉ.शेगाव व अन्य तदनुषंगिक प्रकरणे) | शिक्षणाधिकारी यांनी वैयक्तिक प्रकरणे तात्काळ निर्गत करावीत. संघटना स्तरावरून वारंवार विचारले जाणारे वैयक्तिक प्रश्न सोडविण्यास प्राधान्य द्यावे. बैठकीत चर्चा झालेनुसार या प्रकरणांवर त्वरित कार्यवाही करण्यात यावी. तेच तेच वैयक्तिक प्रश्न पुन्हा बैठकीत विचारले जाणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. या कार्यालयाकडून याविषयी वारंवार कळवूनही संघटनेने मांडलेल्या वैयक्तिक प्रश्नावर बैठकीत ठरल्यानुसार आवश्यक कार्यवाही शिक्षणाधिकारी स्तरावर होत नसल्याचे निदर्शनास येते. तरी जिल्हास्तरावरील व संघटनेने मांडलेली प्रकरणे तात्काळ निर्गत होतील, याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. संघटनेने मांडलेल्या काही वैयक्तिक प्रकरणांवर तात्काळ कार्यवाही करण्याबाबत संचालनालयाकडूनही आदेश देण्यात आलेले आहेत. त्यामुळे या प्रकरणांवर येत्या १० दिवसांत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. थकित वेतन अदा करण्यासाठी ३९ब नुसार सक्षम प्राधिकाऱ्याची आवश्यक मंजूरी घेवून अनुदान मागणी करण्यात यावी. | शिक्षणाधिकारी / वेतन पथक स्तरावर | तात्काळ |
| २. | भ.नि.निधीच्या स्लिपा व नापरतावा प्रकरणे लवकरात लवकर निपटारा होणेबाबत | वेतन पथक यांनी त्यांच्या स्तरावर सर्व लेखे पूर्ण करून मुदतीत भ.नि.नि. स्लिपांचे वितरण शाळांना करणे आवश्यक आहे. तसेच ना-परतावा प्रकरणे विहित कालमर्यादेत निर्गत करावीत. विविध शैक्षणिक संघटनांकडून हा प्रश्न वारंवार उपस्थित केला जात असल्याने शिक्षणाधिकारी यांनी वेतन पथकास आवश्यक त्या सूचना देवून कामकाज पूर्ण करावे. सध्या प्रलंबित असलेल्या सर्व भ.नि.नि. स्लिपांचे वितरण माहे डिसेंबर, २०१६ अखेर पूर्ण होईल, याची सर्व जिल्ह्यांनी दक्षता घ्यावी. शैक्षणिक संघटनांकडून पुढील बैठकीवेळी हा प्रश्न उपस्थित होणार नाही, याबाबत आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी. याविषयी केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास लेखी अवगत करावे. | शिक्षणाधिकारी / वेतन पथक स्तरावर | माहे डिसेंबर, २०१६ अखेर |
| ३. | पदोन्नतीच्या दोन पदाच्या आरक्षणाची अंमलबजावणी करावी. | या प्रकरणी शासन निर्णय दि.६/२/२०१२ मधील तरतुदीनुसार व वेळोवेळी देण्यात आलेले शासन आदेश, वरिष्ठ स्तरावरील सूचना नुसार आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | नियमित |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | माध्य. अतिरिक्त शिक्षक समावेशनाबाबत. | सेवाशर्तीनुसार सेवाकनिष्ठ शिक्षणसेवकाला वाचविण्यासाठी सेवाजेष्ठ शिक्षकाला अतिरिक्त करण्यात येवू नये, ही कार्यवाही चुकीची आहे. अतिरिक्त शिक्षकांना हजर करून घेणे आवश्यक आहे. अतिरिक्त शिक्षकांचे समावेशन होईपर्यंत मूळ शाळेतून वेतन अदा करावे. अतिरिक्त शिक्षकास रूजू करून न घेणाऱ्या मुख्याध्यापकांचे वेतन थांबविण्यात येईल व त्यानंतर संबंधित शाळेतील पद व्यपगत करणेबाबत शासनास प्रस्तावित करण्यात येईल. | शाळा स्तरावर | तात्काळ |
| ५. | सेवापुस्तके, सेवाजेष्ठता यादी तयार नसणाऱ्या शाळा / संस्था यांचेवर कोणत्या स्वरूपाची कार्यवाही अपेक्षित आहे. समयबद्ध स्वतंत्र मोहीम राबविण्यात कोणती अडचण आहे. | दि.१ जानेवारी व १ ऑगस्ट रोजीच्या वेतनदेयकाबरोबर शाळेतील सर्व कार्यरत कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता यादी, सेवापुस्तकाची दुय्यम प्रत पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्राची मागणी करण्यात यावी. तसेच शाळा भेटीवेळी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनाही याची तपासणी करावी. या बाबींची नोंद तपासणी अहवालात घ्यावी. याबाबत व्हॉटसअॅप, इनमायस्कूल, नोटीसबोर्डद्वारे प्रसिद्धी देण्यात यावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | तात्काळ |
| ६. | ज्या शाळा / संस्था शासनाचे कोणतेही आदेश मानत नाहीत, त्याबाबतीत काय करता येईल. | शासन निर्णय दि.०१/०३/२०११ मधील तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी यांनी कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | तात्काळ |
| ७. | अनुकंपा नियुक्ती / मान्यताबाबत. | शासन निर्णय दि.२०/०१/२०१६ नुसार आवश्यक कार्यवाही करावी. तसेच अनुकंपा नियुक्तीबाबत मागणी आल्यास संबंधित संस्थेस कळविण्यात यावे. | संस्था / शिक्षणाधिकारी स्तरावर | तात्काळ |

शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर